म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय आ. वा,
दा. क्र. ३००६

सन १९२९

# चिमुकलीं स्वप्नें

IRBK-0103006
IRBK-0103006

आत्माराम मोरे




ग्रं. सं. ठाणें
बाल-वाङ्मय
क्र. १९८

३००६

ठाणे
९०२७४

ती. आईस—

# चिमुकली स्वप्नें—

लेखकः— आत्माराम भेंडे.

## चन्द्रावर स्वारी !

पात्रें

बाळ
छोटू
विनू
बाबा

## जादुची आंबराई !

पात्रें

छोटी
बाळ
नंदू
शिवाजी
बाजी
( तानाजी, येसाजी, वगैरे )

ऑल इंडिया रेडियोच्या मुंबई केंद्रावरून लहान मुलांच्या कार्यक्रमातून ध्वनिक्षेपित झालेली

IRBK-0103006

किंमत १ आ

IRBK-0103006

स्टेशन डायरेक्टर, ऑल इंडीया रेडियो, मुंबई यांच्या कृपेनें.

शिवशंकर प्रकाशन.
नारायणभुवन बोरकरवांडी,
राममारुती रोड, दादर १२.

प्र का श क.
मो. र. राजाध्यक्ष,
२४ निकदवरी लेन, मुंबई ४.

मुद्रक,
म. र. कालेवार,
प्रफुल्ल प्रिंटिंग प्रेस, नानाशंकरशेट वाडी,
३८० इ, ठाकुरद्वार, मुंबई २.

# चंद्रावर स्वारी !

म. ग्रं. सं. ... ग्रंथालय शाखा.
ग्रा. क्र. ३००६ ... नों दि.
दि. ८।१।७१

( रस्ता : बाळ, छोटू आणि विजू घाईघाईनें कुठेतरी जात आहेत. )

बाळ०—चला लवकर ! पाय उचला झरझर !

छोटू०—अं ? अर्धा तास आहे ना अजून विमान सुटायला ?

बाळ०—( आश्चर्यानं ) अर्धा तास ? कुणी सांगितलं तुला ?

विजू०—वा रे वा बाळ ! तूंच म्हणाला नाहींस का मघाशीं !

बाळ०—हो म्हणालो कीं ! पण मघाशीं म्हणालो. त्याला झाला आतां पाऊण तास.

छोटू०—खोटा कुठचा ! पाऊण तास कुठचा ? पाऊण मिनीट सुद्धां झालं नसेल. गाढव कुठचा !

बाळ०—( रागानं ) बरं, बरं ! आहे मी गाढव ! मग येतांय कशाला माझ्याबरोबर ?

विजू०—आम्ही तुझ्याबरोबर कुठं येतोय ? आम्हाला एकटं जायला काय पाय नाहींत ? खरं की नाहीं ग छोटी ?

छोटू०—तर काय ? या बाळ्याला वाटतं, सर्व लोक अगदीं आपल्यावर अवलंबून आहेत म्हणून.

बाळ०—( रागानं ) बघ हां छोटू, बाळ्या म्हणूं नकोस मला. तुला छोटू-खोटू म्हटलं, की कां रागावतेस मग ?

छोटू०—म्हणेन म्हणेन जा.

विजू०—छोटू, बाळ; आतां गप्प राहातां की नाहीं? कुठेंही जायला निघावं, तर तुमचं आपलं भांडण आहेच.

छोटू०—म्हणजे छान! भांडण उरकून काढलंस तूं आणि वर मलाच दम देतेस काय?

विजू०—भांडण मी उरकून काढलं? वा ग वा!

बाळ०—(टाळ्या पिटीत) भले! माझ्याशीं भांडतां भांडतां, शेवटीं आपसांतच भांडूं लागलांत? कितो झालं तरी बायकांची जात. कुणी तरी म्हटलंच आहे—

विजू०—(एकदम) काय?

बाळ०—(एकदम) नाकांत दोन पाय! (हसतो.)

(छोटू पण विजूला खिजवण्यासाठीं हसते.)

विजू०—(रागानें) बघ हं छोटू! हसूं नको मला तूं. (रडत मी आपली घरींच जातें कशी!

बाळ०—उगी उगी हं. मी आपली थट्टा केली हो तुझी विज.

छोटू०—कशाला तिला मस्का लावतोस बाळ? जाऊंदे परत घरीं तिला.

विजू—हो अडलंय माझं खेटर घरीं जायला. तूंच जा हवं असलं तर घरीं.

बाळ०—खरंच, खेचरं देखील शहाणी असतात तुम्हां बायकांपेक्षां. लागलांत तुम्ही पुन्हा भांडायला? कुणी तरी म्हटलंच आहे—

"बायकांची जात।
भांडणाशिवाय पळ नाहीं जात॥"

छोटू०—आणि तुम्हां पुरुषासंबंधीं काय म्हटलंय, आहे का माहीत?

बाळ०—नाहीं बुवा !

छोटू०—नाहीं ना ? ऐक तर मग.

"पुरुषांची जात ।

बायकांची भाडणं लावण्यात, धरणार नाहीं कोण हात ॥"

( छोटू व विजू मोठ्यामोठ्यानं हसतात. )

विजू०—(टाळ्या पिटीत) कशी जिरली एका "पुरुष" माणसाची !

बाळ०—जिरली तर जिरली, पण अँऽऽअँऽऽ ( असा रडल्यासारखा आवाज करून ) करून ढेकर नाहीं दिले तुम्हां बायकां माणसासारखे. म्हटलं शिवाजीचा शूर शिलेदार आहे मी—

छोटू०—( उपहासानं ) आहाहाऽऽ!! काय पण रडकी सूरत आहे शूर शिलेदारची ! आणि हा असला रडका शिलेदार म्हणे चंद्रावर स्वारी करायला निघालाय.

बाळ०—अरे खरंच ! विसरलोच मी तें. पळा पळा !! विमान सुटलं सुद्धां असेल कदाचित. चला पळा. ( सर्व पळत सुटतात. शेवटी विमान-तळावर येऊन पोंचतात एकदांचे )

बाळ०—( एका विमानाकडे बोट दाखवून ) हेंच ते विमान चढा आंत लवकर.

( सर्व जाऊन आंत बसतात. तेव्हढ्यांत विमान सुटतं )

बाळ०—(सुस्कारा सोडून) अगदी वेळेवर पोचलों बरं का आपण. नाहींतर मग बराच वेळ बसावं लागलं असतं पुढच्या विमानासाठीं.

छोटू०—अय्या ! तिकिटंच काढली नाहींत आपण.

बाळ—( हळूच खिशांतून तिकीटं काढून दाखवीत ) ही पहा म्हटलं मिस्टर ! कालच काढून ठेवली होती मी.

विजू०—अय्या, खरंच की !

छोटू०—पण कायरे बाळ, नेहमी विमानांत अशीच गर्दी असते कारे ?

बाळ:—चंद्रावर जायला, म्हणतेस ?

छोटू०—हो.

बाळ०—होय तर ! ही चन्द्रावरची स्पेशल सर्विस सुरू झाल्यापासनं ही अश्शी गर्दी असते.

विजू०—काय कमाल आहे पहा !

बाळ०—कसली ?

विजू०—डोक्याची !

बाळ०—डोक्याची ? म्हणजे माझ्या डोक्याला काय झालंय कीं काय ?

विजू०—डोकं तुझं ! तुझ्या डोक्याची नव्हे, माणसाच्या !

बाळ०—( रागानं ) म्हणजे ? मी माणूस नाहीं की काय ? डोकं फिरलंय तुझं !

विजू०—अरे बिनडोक्या, मी म्हणतेय साऱ्या मनुष्य जातीबद्दल. माणसानं काय काय कमालीचे शोध लावलेत. हीच ओटॉमॅटीक शक्ती—

( बाळ मोठ्यामोठ्यानं हसतो )

विजू०—कायरे ? काय झालं हसायला ?

बाळ०—( हसत ) हसू नको तर काय रडूं ? अग विजू, ऑटोमॅटीक नव्हे—ॲटॉमिक् शक्ती—

विजू०—कांहीं का असेना ? असेल ॲटॉमिक् नाहींतर टॉमॅटिक् ! पण चन्द्रावर जायला विमानाची सर्विस ठेवणं म्हणजे काय चेष्टा आहे ?

बाळ०—आँ ? पण ही छोटी काय करतेय मघापासनं ?

छोटू—( खिडकीतून बाहेर पहातां पहातां ) चालंद्या तुमच. मीं ऐकतेय. वेड्यानो, या कांचेतून बाहेरची शोभा बघायची सोडून भांडता काय मोठ्या माणसासारखे ?

विजू०—( खिडकीतून बाहेर बघत ) अय्या ! खरंच, किती सुंदर देखावा हा !

बाळ०—( बाहेर पहात ) किती हे तारे !

छोटू०—कसे लुकलुकताहेत !

विजू०—अमवास्येच्या रात्रीं जसे काजवे !

बाळ०—छे, छे ! आपल्याला पाहून डोळे मिचकावून हसताहेत ते.

छोटू०—कोण ?

बाळ०—आकाशींचे सवंगडी !

विजू०—देवाची मुलं !

बाळ०—देवाची स्वतःची नव्हेत.

छोटू०—मग ?

बाळ०—माणसांचीच, पण देवाची आवडती.

विजू०—देवाची आवडती मुलं देव इथं आणून ठेवतो ?

छोटू०—हो. आपला साऱ्यांचा श्याम नाहीं का देवाघरीं गेला !

विजू०—हो ! हो ! त्याचे वडील म्हणत होते खरे, देवाचा आवडता श्याम देवानं लवकरच नेला आपल्या घरीं म्हणून.

छोटू०—अय्या ! आपली पृथ्वी पहा कशी इवल्याशा चेंडूसारखी दिसते.

बाळ०—आणि तिच्या सभोंवती किती हे तारे !

विजू०—ताऱ्याचे पुंजकेच्या पुंजक !

छोटू०—द्राक्षाचे घोंस लटकताहेत जसे !

विजू०—ताऱ्यांची माळ करून देवानं पृथ्वीदेवीच्या गळ्यांत घातली आहे जशी कांहीं.

बाळ०—म्हणज आकाशांत पृथ्वीचं लग्न आहे कीं काय ?

छोटू०—त्याचाच का हा सोहळा ?

बाळ०—तेवढ्याचसाठीं का ही ताऱ्यांची आरास ?

छोटू०—पाहुण्यांची धावपळ ?

विजू०—मजा आहे, नाहीं ?

छोटू०—अजून किती वेळ लागेल रे पोंचायला, बाळ ?

बाळ०—तुला एवढी घाई कसली आहे, छोटू ?

छोटू०— घाई नाही रे.

विजू०—तरी पण चंद्र पाहायला तीं अगदी आतुर झाली असेल.

छोटू०—आणि तूं नाहीं जशी कांहीं आतुर झालीस ?

विजू०—पण नाहीं कोण म्हणतंय ?

बाळ०—हें पहा, तुम्ही परत भांडायला लागतात. चंद्रावर पोंहचल्यावर जर का भांडलात, तर एकेकाला ढकलून देईन चन्द्रावरून खाली.

विजू०—काहीं हरकत नाही.

छोटू०—दे ढकलून खाली.

विजू०—पडलों तर खाली पृथ्वीवरच पडूं ना ?

बाळ०—हो. पृथ्वीवरच पडाल.

छोटू०—मग झालं तर.

बाळ०—काय झालं? एवढ्या उंचीवरून पडल्यामुळं हाडं खिळखिळी होतील त्याची काय वाट?

विजू०—होऊं दे. तुला काय त्याचं?

छोटू०—( खिडकीतून पहात ) अरे, भांडत काय बसलांत? चन्द्र दिसूं लागला कीं.

विजू०—अरे खरंच आला – आला जवळ.

बाळ०—चन्द्र नाहीं जवळ आला. आपण त्याच्या जवळ आलों.

विजू०—पुरे रे तुझी पोपटपंची.

छोटू०—( चन्द्राकडे पहात ) अय्या विजू, पाहिलंस का?

विजू०—खरंच, किती सुंदर!

छोटू०—दिसतोय पहा कसा मोसंब्यासारखा.

विजू०—आणि डाग कसले हे त्याच्यावर?

बाळ०—चन्द्राला कोणीतरी शाप दिला होता म्हणं पूर्वी.

विजू०—कोणीतरी? हा कोणीतरी म्हणजे दाढीवाला ऋषि असणार—

बाळ०—असेल कदाचित.

विजू०—म्हणून का हे डाग पडले त्याच्या अंगावर?

बाळ०—हो.

छोटू०—आणि हे सशाचं चित्र कोणी काढलय चन्द्राच्या पाठीवर?

विजू०—अय्या खरंच! अगदीं हुबेहुब सशाची आकृति दिसते.

बाळ०—ही सशाची आकृति चन्द्राच्या पाठीवर आहे. म्हणून तर चन्द्राला "शशांक" म्हणतात!

विजू०—खरं की काय?

बाळ०—मग मी काय खोटं सांगतो?

छोटू०—( खिडकीतून बाहेर पाहात ) ओहो! किती जवळ आला चन्द्र!

विजू०—आणि तो लाल ठिपका कसला दिसतो रे चन्द्रावर?

बाळ०—अग तो बावटा आहे.

विजू०—तो कशाला?

बाळ०—तिथं आपल विमान थांबणार.

छोटू०—हं! हं! म्हणजे विमान उतरण्याची जागा वाटतं ती.

बाळ०—हो.

छोटू०—( कानोसा घेत ) विमान उतरायला लागलं वाटतं.

बाळ०—हो नक्कीच.

विजू०—किती लवकर आलो आपण चन्द्रावर?

बाळ०—एकमेकाला घट्ट धरा हं आतां.

छोटू०—कशाला?

बाळ०—( वेडावून ) कशाला? एवढी साधी गोष्ट तुला समजत नाहीं?

विजू०—अरे, पण सांगितल्याशिवाय समजणार कशी?

बाळ०—बोंडल्यांनच दूध पितां की नाहीं तुम्ही?

छोटू०—हे बघ बाळ, तुझा रुबाब नको आहे उगीच.

विजू०—तुला काय वाटतं, तुझ्याशिवाय आमचं चन्द्रावर अडेल म्हणून?

बाळ०—नाहींतर काय?

छोटू०—भ्रम आहे तुझा.

बाळ०—बऽऽरं. समजेलच आतां एकमेकांला घट्ट धरूं नका, आमचं काय जातंय ?

विजू०—( मनांत घाबरून ) धरतो रे आम्ही—

छोटू०—पण कां म्हणून विचारलं, तर सांगाव सरळ.

बाळ०—बायानोऽऽऽ ! धरलं नाहींत, तर विमान थांबताना धक्का बसून पडाल. आतां तरी समजलं.

विजू०—हो समजल.

छोटू०—असं नीट समजाऊन सांग.

बाळ०—धरा आतां नीट. थांबायला आलं हं विमान !

( विमान थांबत. थांबताना धक्का बसतो )

बाळ०—पाहिलात केवढा धक्का बसला तो.

विजू०—हो रेऽऽहो.

छोटू०—चला उतरा आतां.

बाळ०—हं, घाई नको हां. सावकाश. बाहेर फार थंड असतं इथं म्हणे.

विजू०—काय थंड असतं ?

छोटू०—दूसरं काय ? हवा.

बाळ०—चला आतां. उतरा.

( सर्व विमानातून खाली चन्द्रावर उतरतात. )

विजू०—( थंडीनं कुडकुडत ) अु हु हू ! काय थंड हवाही ?

छोटू०—किती सुंदर चांदणं पडलंय इथं !

विजू०—खरंच इथं बाराही महिने असं चांदणं असेल नाहीं ?

बाळ०—तर ! चंद्रच मुळीं हा.

छोटू०—चला. आतां थोडं फिरून येऊं.

विजू०—हो चला ( सर्व फिरायला निघतात )

छोटू०—अय्या ! समोर किती पर्वत हे.

बाळ०—चांदण्यांत कसे, ऋषी तप करायला बसल्यागत दिसतात.

विजू०—आणि इथं झाडं तर मुळीच दिसत नाहींत.

छोटू०—आणि माणसं, जनावरं पण दिसत नाहींत.

बाळ०—इथं कशाला माणसं येतील ? मरायला ?

विजु०—आपण इथं कशाला आलात ? मरायला वाटतं ?

बाळ०—आपण इथं फिरायला आलोंत.

छोटु०—पण मग इथं कायमचं राहायला काय हरकत आहे ?

बाळ०—हरकत काहीं नाहीं. पण जगणार कशावर ?

विजू०—अय्या खरंच ? इकडे पाणी सुद्धां दिसत नाहीं.

छोटू०—झाडंपेडं तर नाहींतच—

बाळ०—म्हणजे सगळं पृथ्वीवरूनच आणावं लागेल.

विजू०—( समोर पाहून घाबरून ) अग आई ग !

छोटू०—काय झालं ग ?

विजू०—अग समोर पहा.

बाळ०—अरे बापरे ! केवढी प्रचंड दरी ही !

छोटू०—नजर पोंचत नाहीं शेवटपर्यंत.

विजू०—तूं पाहूंच नको तिकडे, छोटू.

बाळ०—किती शांत आहे इथं !

छोटू०—पण फार भयंकर वाटते ही शांतता.

विजू०—भयंकर काय ग त्यांत?

छोटू०—भयंकर काय म्हणे! तुला इथं एकटी सोडली तर राहशील?

विजू०—हो राहीन की. तुझ्यासारखी भित्री भागुबाई नाहीं मी.

छोटू०—असुं द्या मी भित्री, तुला कोण विचारतो कुत्री?

बाळ०—लागलांत पुन्हां भांडायला? आतां देतो एकेकाला खाली ढकलून.

विजू०—दे पाहूं ताकद असेल तर बाळ.

बाळ०—थट्टा वाटते तुला? खरंच फेकीन मी. माझा राग आहे वाईट....

विजू०—माहित आहे तुझा राग. फेक ना मग? तोंडच्या गप्पा नुसत्या.

बाळ०—(रागानं) असं काय? ही घे मग (विजुला उचलून खाली फेकतो. विजु किंकाळी मारते आणि झोपेतून जागी होते.

बाबा०—अग, अग विजू. ओरडायला काय झालं? घाबरली वाटतं पोरगी? घाबरूं नकोस हं. मी तुला उचलून तुझ्या बिछान्यावर झोपवलो. पलंगावर वाचतांवाचतां झोपली होतीस; लोळतां लोळतां खाली पडशील, म्हणून खाली तुझ्या बिछान्यांवर उचलून ठेवली तुला. त्यांत एवढं घाबरायला आणि ओरडायला काय झालं?

विजू०—म्हणजे, तुम्ही उचललंत मला? मला वाटलं बाळनं.

बाबा०—(मोठ्यानं हसत) कोण? आपलं बाळ? तो काय उचलणार! अग, तूंच त्याला उचलून फेकून देशील.

विजू०—तसं नाहीं बाबा. आम्ही चन्द्रावर गेलों होतो—

बाबा०—बंदरावर ? ( याना ऐकूं जरा कमी येतं )

विजू०—बंदरावर नाहीं. चन्द्रावर.

बाबा०—कधीं ?

विजू०—खरं नाहीं हो. स्वप्नात—

बाबा०—लग्नात ? कोणाच्या ?

विजू०—लग्नात नव्हे. स्वप्नात.

बाबा०—स्वप्नात होय ? तरी मी म्हणतो, मला नाहीं कसं कळलं ?

विजु०—बरं का बाबा. आपली ऑटोमॅटीक शक्ती आहे ना ? त्या शक्तीच्या जोरावर म्हणे, चन्द्रावर जायला विमानाची सर्विस सुरू होणार आहे.—

बाबा०—हां हां !अॅटॉमिक शक्ति होय ? हां हा ! वाचलं होतं खरं.

विजू०—तर तशा विमानातून आम्हीं गेलों होतो चन्द्रावर—

बाबा०—छान छान ! कमाल आहे तुम्हा पोरांची ! कुठुन तरी, काहीं तरी, वाचून येतां आणि मग स्वप्नात असें घाबरून ओरडतां. बरं बरं ! आता चला झोपायला. आता मात्र यावेळीं सूर्यावर जाऊ नकोस हं फिरायला.

( मोठ्यामोठ्यानें हसतात )

# जादूची आंबराई !

**स्थळ : रस्ता. वेळ : संध्याकाळ.**

छोटू : हा आमचा गांव, नंदू !

बाळ : आहे खेडेगांवच....

छोटू : पण किती सुंदर !

बाळ : नांवच मुळीं सुंदरगांव !

छोटू : नांवासारखं गांव....

नंदू : आणि गावांसारखी मुलं !

बाळ : फक्त छोटू सोडून, हं नंदू !

छोटू : कां रे बाळ, मी कां सुंदर नाही ?

बाळ : नकट्या नाकाच्या मुलीला सुंदर कोण म्हणेल ?

छोटू : स्वतःचा चेहरा आरशांत बघितला आहेस कां कधीं ?

नंदू : छोटू, बाळ ! तुम्हीं भांडत बसणार, कीं तुमचा गांव दाखवणार मला ?

बाळ : अरे विसरलोंच. तुला आमचा गांव दाखवायचा आहे नाहीं कां !

छोटू : आमच्या गावांच आम्हांला कांहीं विशेष वाटत नाहीं !

नंदू : पण आम्हां शहरांतून आलेल्या मुलांना वाटतं ना ?

बाळ : विशेष नाहीं कसं, छोटू ?

छोटू : तसं आमच्या गावांत पहाण्यासारखं खूप आहे म्हणा !

नंदू : तेवढ्यासाठीं तर मी इथं आलो.

बाळ : आणि तेवढ्यासाठीं तर आतां आपण फिरायला निघालों.

छोटू : मग प्रथम नंदूला काय दाखवायचं, बाळ ?

बाळ : अर्थांत जादूची आंबराई !

नंदू : काय ? जादूची आंबराई ?

छोटू : हो ! जादूची आंबराई !

नंदू : म्हणजे, जादूचे आंबे लागतात की काय तिथल्या झाडांना ?

बाळ : छे ! छे ! तशी कांहीं जादू नाहीं तिथें.

नंदू : मग रे कसली जादूची आंबराई ?

छोटू : आमच्या बाळानंच दिलय नांव तिला "जादूची आंबराई" म्हणून !

नंदू : असं का ? मग बाळच सांगेल तिथं कसली जादू आहे ती.

बाळ : हो सांगतो की—

छोटू : अरे पण ही आलीच की आपली जादूची आंबराई.

नंदू : हीच का ती आंबराई ?

बाळ : चला आपण आंत जाऊं.

छोटू : थांब हं. मी फाटक उघडते.

[ सर्व जण फाटक उघडून आंत जातात ]

नंदू : अहाहा ! किती गार वाटलं मला आंत आल्यावर !

छोटू : बाहेर अजुन ऊन आहे—

बाळ : अर्थांत कोंवळं !

छोटू : कोंवळं कां होंईना, पण आहे, पण आंत आल्यावर कसं अगदीं सूर्य मावळून गेल्यासारखं वाटतं.

नंदू : आंत आंबराईंत उन्हाचं टिपूस सुद्धां येत नाहीं—

बाळ : अंहं ! तसं नको समजूस हं तूं !

नंदू : म्हणजे ? माझ्या स्वतःच्या डोळ्यानां दिसतं तें खोटं की काय ?

छोटू : तसं नाहीं ! पण अजून थोडं पुढें चालून गेल्यावर कळेल बाळ काय म्हणतो तें !

बाळ : हं ! ते पहा समोर !

नंदू : कुठं काय ?

छोटू : तें समोर रांगोळी घातल्यासारखं दिसत नाहीं तुला ?

नंदू : हं ! हं ! दिसत खरं !

बाळ : ते तसं कां दिसत माहीत आहे ?

नंदू : हं ! हं ! आता आलं लक्षांत.

छोटु : काय ? सांगू पाहूं !

नंदू : झाडाच्या पानांतून जमिनीवर पडलेले उन्हाचे टिपके आहेत ते.

छोटू : किती सुंदर दिसतात, नाहीं ?

नंदू : आणि कसे पण अगदी वर्तुळाकार पडलेत !

बाळ : [ जरा दूर जाऊन ] इकडे या नारे !

छोटू
नंदू } आलों हं ! [ बाळजवळ जातात ]

नंदू : काय सुंदर जागा आहे ही !

बाळ : बसा इथं हिरवळीवर.

नंदू : [ बसत ] ही बसले मी ! [ सर्वजण बसतात ]

बाळ : काय नंदू, कशी काय वाटते ही जागा ?

नंदू : वा ! सुंदर ! थंडगार वारा सुटलाय—

छोटू : आजुबाजुला पाखरं गाताहेत.

नंदू : मऊ मऊ हिरवळ मांडीला गुदगल्या करतेय.

बाळ : इथंच झोपावसं वाटत असेल तुला नाहीं ?

नंदू : खरंच ! किती छान झोप येईल इथं !

बाळ : जरा मागं लेटुन त्या वर्तुळाकार पडलेल्या उन्हाच्या टिपक्याकडे पहा पाहूं.

नंदू : अरे ! काय मजा ! ! तो तेवढा भाग जसा कांहीं एका मोठ्या घड्याळा सारखाच दिसतो.

बाळ : कांटे आहेत का त्या घड्याळाला ?

नंदू : अरे खरंच ! दोन फांद्याची सांवली पडून कसे अगदी दोन कांटे असल्यागत दिसतय.

बाळ : बरं का, एकदा मी आणि छोटु इथं फिरायला आलों होतो. फिरता फिरता छोटुला चुकवून मी इथं येऊन घड्याळाची गंमत पहात पहुडलो....

[ इतक्यांत एकदम जोराचा वारा सुरू होतो. ].

बाळ : अरे बापरे ! काय ह्या वारा—एकमेकांना धरून राहा रे. नाहींतर जाल उडून—

[ वारा कमी होत होत बंद होतो ]

नंदू : ( निश्वास सोडून ) बरं झालं बुवा, लवकर बंद झाला वारा.

छोटू : मी तर अगदीं घाबरून गेलें होते.

बाळ : ( आश्चर्यानें ) अरे ! हें काय नवल ?

नंदू : काय झालं ?

बाळ : तिकडे बघ.

छोटू : अय्या ! घड्याळ ! !

बाळ : तो घड्याळासारखा दिसणारा भाग खरंखुरं घड्याळंच झाला की !

नंदू : आणि हे आंकडे असे काय ?

बाळ : एक, दोन, तीन आंकड्या ऐवजी शंभर वर्षापूर्वी, दोनशेंवर्षा-पूर्वी, तीनशें वर्षापूर्वी,—!

छोटू : असे काय हे आंकडे ?

बाळ : आश्चर्य आहे !

नंद : अरे ! ते पहा काटे फिरूं लागले.

छोटू : हं ! थांबले !

बाळ : कितींवर ?

नंद : ' तीनशें वर्षांपूर्वी ' या आकड्यावर.

[ पुन्हा एकदम जोराचा वारा सुटतो ]

छोटू : काय हा वारा, पुन्हा पुन्हा छळतोय् !

[ वारा हळू हळू थांबतो ]

बाळ : थांबला बुवा !

नंदू : अरे, पण हें काय ? घड्याळ कुठ गेलं ?

छोटू : आणि आपली आंबराई पण बदलल्यासारखी दिसते.

[ दुरून सनईचे स्वर ऐकूं येतात. ]

बाळ : सनई कोण वाजवतोय् ?

नंदू : [ दूर पाहून ] हा पलिकडे किल्ला कोठून आला ?

बाळ : किल्ल्यावर झेंडा पण फडकतोय् !

छोटू : सनई पण किल्ल्यावरच वाजतेय.

बाळ:—कांहींतरी गडबड दिसतेय.

[ दुरून घोड्याच्या टापा ऐकूं येतात ]

नंदू : हा कसला आवाज.

छोटू : कोणीतरी घोड्यावरून येताहेत.

बाळ : [ दूर बोटानें दाखवून ] ते पहा. दिसले का ?

नंदू : हो हो ! अरे, हे तर शिवाजी महाराज !

छोटू : कशावरून रे नंदू ?

बाळ : अग, त्यांच्या एकंदर रुबाबावरून, दुसरं काय ?

नंदू : अथातच. पहा ना कसा जिरेटोप खुलून दिसतोय !

छोटू : काय पण भरदार शरीर आहे !

[ टापांचे आवाज जवळ जवळ ऐकूं येतात आणि एकदम थांबतात. ]

बाळ : अरे, ते पहा सगळे त्या खिंडीच्या तोंडाशी घोड्यावरून उतरले.

नंदू : ते बरोबर कोण आहेत महाराजांच्या ?

छोटू : कोण जाणे ?

बाळ : चला आपण हळूं हळूं लपत छपत तिथं जाऊं---

नंदू : आणि ते काय बोलतात ते ऐकूं.

छोटू : चला [ सर्व लपत छपत जातात. ]

शिवाजी : बाजी, ही कामगिरी तुझ्यावर सोपवतोय.

बाजी : महाराज, आपण निर्धास्त असावं. हा मराठ्याचा बच्चा, शेवटचा रक्ताचा बिंदू अंगात असेपर्यंत महाराजांच्या केसाला धक्का लागू देणार नाहीं.

शिवाजी : धन्य बाजीप्रभु देशपांडे ! तुझ्यासारखा स्वामिनिष्ठ विरळा !

बाळ : [ लपलेल्या जागेंतून एकदम पुढें होऊन ] विरळा का म्हणतां, महाराज ? आम्ही पण आपल्यासाठी जीव द्यायला तयार आहोंत.

नंदू : ( पुढें होऊन ) होय महाराज !

छोटू : [ पुढें होऊन ] होय महाराज !

शिवाजी : ( आश्चर्यानें) अरे ! ही मुलं कोण ? कोणी का असाना ! तुम्हीं माझ्यासाठीं जीव द्यायला तयार आहांत ना ?

बाळ<br>
नंदू } हो ! हो !<br>
छोटू

शिवाजी : मग पाहूंच तर प्रचिती. माझ्या लाडक्या विरांनो ! शत्रु आतां इथं येऊन पोंचेल. त्याला थोपवून धरायची कामगिरी मी तुमच्याकडे सोपवतों. मी किल्यावर सुखरुप पोहोंचल्यावर तोफा डागीन. तोपर्यंत या खिंडीतच शत्रुला थोपवून धरा. ह्या घ्या तलवारी. (बाजी प्रभू जवळून तलवारी घेऊन मुलांना देतात) बरं, बालविरांनो, ईश्वर तुमचा पाठिराखा आहे. मी निघतो. बाजी, ताना, येसा, चला झटपट.

[ सर्व जण घोड्यावर बसून जातात. ]

बाळ : तलवार फिरवता येते ना छोटू ?

छोटू : पहाशीलच कीं आतां !

नंदू : केव्हां शत्रू येईल असं झाल्यं मला.

बाळ : तो पहा, समोर धुरळा उडालेला दिसतो.

नंदू : शत्रू एका क्षणांत इथं येऊन पोचेल.

छोटू : तयार हं ! हुश्शार ! !

बाळ<br>नंदू<br>छोटू } : शिवाजी महाराज कीं जय !!

[ प्रथम घोड्यांच्या टापा ऐकूं येतात. मागाहून शत्रुंचा गलका ऐकू येतो. ]

शत्रुकडील माणसं : मारा ! मारा ! पकडा ! पकडा !

शत्रुकडील माणसांचे आणि बाळ, नंदू, छोटू यांचे युद्ध सूरू होतें. ]

बाळ : ( वार करून ) भोग आपल्या कर्माची फळं !

[ थोडा वेळ युद्ध झाल्यावर ]

बाळ : अजून कशी तोफ होत नाहीं ?

नंदू : महाराज विसरले कीं काय ?

छोटू : अहारे, शूर शिपाई ! तोफेची वाट पहात बसलेत !

बाळ : मी भीत नाहीं काहीं. पण महाराजांची काळजी वाटते मला. जून किल्यावर पोंचले नाहींत म्हणजे वाटेंत काहीं अपघात विपघात तर झाला नाहीं ना ?

नंदू : आतां होईल रे तोफ—

[ एकदम तोफेचा आवाज होतो-त्याला घाबरून बाळ किंकाळी फोडतो ]

बाळ : आणि मी जागा झालो. ती तोफ नव्हती. छोटूनं मला शोधून काढल होतं. मी झोंपलो होतो, म्हणून मला जागं करण्यासाठीं माझ्या कानाजवळ तीनं मोठ्यानं ठोSSS असं केल्यामुळं मी घाबरून जागा झालो होतो.

नंदू : वा ! छान ! पण काय रे, हें स्वप्न तुला पडल्यामुळं ही आंबराई जादुची कशी ठरते ?

बाळ : सांगतो. वेळ मिळेल त्यावेळी मी संध्याकाळीं इथं येतों. ह्या हिरवळीवर इथच असाच य न्हाच्या टिपक्याच्या घड्याळाकडे पहात पहुडतो—

छोट : आणि मग थंड वारा आणि चिमण्यांच संगीत यामुळं तुला झोप येते, असंच ना ?

बाळ : हो. पण गम्मत अशी कीं नेहमी तेंच घड्याळ माझ्या स्वप्नांत येतं, त्याचे काटे कुठल्यातरी आकड्यावर थांबतात, आणि तेवढ्या वर्षा मागल्या लोकांत मी वावरूं लागतो. आणि दुसरी गम्मत अशी कीं स्वप्नांत तुम्ही दोघं नेहमी माझ्यावरोबर असतां.

नंदू : आणि म्हणून तू या जागेला 'जादूची आंबराई' म्हणतोस होय ?

बाळ : हो !

नंदू : वा. छान आहे तुमची ' जादूची आंबराई '

[ सर्वजण हंसतात ]

—x—

म. ग्रं. सं. [redacted]
वा. क्र. ....
दि. ....
IRBK-0103006

# आमचें प्रकाशन


कुमार-साहित्य

| | |
|---|---|
| बहादूर चंद्रसेन ... ... ... | भगवंत राजाध्यक्ष |
| सोनेरी शिंपला ... ... ... | दीनानाथ म्हात्रे |
| चतुरा ठग ... ... ... | शिवशंकर खोत |
| चिमुकलीं स्वप्नें ... ... ... | आत्माराम भेंडे |
| चेंगिझखान ... ... ... | |
| समुद्राच्या तळाशीं ... ... ... | जयवंत पाठारे |
| चंद्र ढळला (कादंबरी) ... ... | दीनानाथ म्हात्रे |
| | सदानंद रेगे |
| ससाचीं शिंगें (नाटक) ... ... | माधव मनोहर |

**शिवशंकर प्रकाशन**

राम-मारुति रोड, दादर